महाराष्ट्र टाइम्स

महामुंबई

१ फेब्रुवारी २००९ | मुंबई

# डॉ अशोक गुप्ता यांना पद्मश्री

म. टा. प्रतिनिधी



प्रसिद्ध प्लॅस्टिक सर्जन डॉ. अशोक गुप्ता यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. अमेरिका, इंग्लंड, जपान या देशांमध्ये मायक्रो-व्हस्क्युलर सर्जरी, लेझर सर्जरी, कॅन्सर रिकन्स्ट्रक्टीव्ह सर्जरी यात त्यांनी विशेष प्राविण्य मिळवले आहे. परदेशात चांगल्या संधी असतानाही भारतात ग्रामीण भागात वैद्यकीय क्षेत्रात आपल्या ज्ञानाचा उपयोग करण्याचा निर्धार करून डॉ. गुप्ता मायदेशी परतले. ग्रँट मेडिकल कॉलेज, बॉम्बे हॉस्पीटल इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्समध्ये त्यांनी शिक्षक म्हणूनही काम केले.